जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | मंगळवार
२५.०८.२०२६
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २०६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

## काव़ड यात्रेदरम्यान ट्रकची धडक
## ८ वर्षीय चिमुकला ठार : ट्रक पेटविला




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगांव** – श्रावण महिन्यातील दुसरा सोमवार असल्याने आज अनेक ठिकाणी कावड यात्रा आणि शिव मंदिरात भाविकांची गर्दी दिसून येत आहे. जळगाव-ममुराबाद रस्त्यावर प्रजापती नगरजवळही अशीच कावड यात्रा सुरू असताना भरधाव ट्रकच्या धडकेत आठ वर्षाच्या मुलाला मृत्यू झाल्याची दुर्घटना घडली. कावड यात्रेदरम्यान ममुराबाद रस्त्यावर देवीच्या मंदिरामधून दर्शन घेऊन बाहेर येणाऱ्या ८ वर्षीय मुलाला ट्रकने चिरडल्याने हा अपघात झाला. या अपघातानंतर स्थानिकांनी चालकाला बेदम चोप दिला असून संतप्त जमावाने ट्रक पेटवल्याची घटनाघडली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलासह पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून अधिक तपास सुरू आहे. श्रावण मासानिमित्ताने कावड यात्रेचा उत्साह सुरू असतानाच दोन ठिकाणी दुर्घटना घडल्या आहेत. वर्धा येथी पुलगाव येथे कावड यात्रेत मोठी दुर्घटना घडली. कावडचा ढाचा पडल्याने एका पाच वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची मन हेलावणारी घटना घडली. अधिराज रवी पाटील असं मृत चिमुकल्याचं नाव आहे. पुलगांवच्या राम मंदिराजवळ ही घटना घडली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. तर, जळगावमध्येही ट्रकच्या धडकेत ८ वर्षीय चिमुकल्याला आपला जीव गमावावा लागला. जळगाव जिल्ह्यातील ममुराबाद रस्त्यावर प्रजापती नगराजवळ भरधाव ट्रकने आठ वर्षीय मुलाला चिरडल्याची धक्कादायक घटना घडली. कावड यात्रेदरम्यान देवीच्या मंदिरात दर्शन घेऊन बाहेर पडताना या चिमुकल्याला ट्रकने धडक दिली. या भीषण अपघातात मुलाचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर संतप्त जमावाने ट्रक पेटवून दिला. घटनेची माहिती मिळताच पो-लीस आणि अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले.

## मुंबईतील आलिशान 'रुस्तमजी क्राउन'वर पालिकेचा हातोडा!
### फ्लॅट्समधील अनधिकृत बांधकामांवर बीएमसीची धडक कारवाई

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबईतील प्रभादेवी येथील क्राउन मिल कंपाऊंडमधील अत्यंत आलिशान मानल्या जाणाऱ्या 'रुस्तमजी क्राउन' या गृहप्रकल्पावर मुंबई महानगरपालिकेने (बीएमसी) कारवाईचा बडगा उगारला आहे. इमारतीमधील १२८ फ्लॅट्सच्या मालकांनी सामाईक मोकळ्या जागांवर अनधिकृतपणे कब्जा करून परस्पर बांधकाम केल्याचा आरोप असून, या बेकायदेशीर बांधकामांवर पालिकेने निष्कासनाची मोहीम सुरू केली आहे.

या आलिशान प्रकल्पात अनेक बडे राजकीय नेते, वरिष्ठ सनदी अधिकारी आणि नामांकित उद्योगपतींचे फ्लॅट्स असल्याने या



कारवाईने रिअल इस्टेट वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.

**२५० कोटींहून अधिक किमतीच्या जागेचा वाद**

तक्रारीनुसार, इमारतीतील लिफ्टसमोरील सामाईक मोकळी जागा फ्लॅट मालकांनी आपल्या घरांमध्ये समाविष्ट करून घेतली होती.

**मोठ्या मूल्याची जागा**

या इमारतीमध्ये प्रति चौरस फूट घरांचे दर १ लाख रुपयांपेक्षा जास्त असून, हडप करण्यात आलेल्या सामाईक जागेचे बाजारमूल्य २५० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे.

माहिती अधिकार **कार्यकर्त्याची तक्रार**

माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष दौंडकर यांनी विकास नियंत्रण नियमावलीचा भंग करून लिफ्टसमोरील जागा गिळंकृत केल्याची तक्रार पालिकेकडे केली होती.

**कारवाईचे आदेश**

तक्रारीची शहानिशा केल्यानंतर बीएमसीच्या जी-दक्षिण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी थेट अनधिकृत बांधकामे तोडण्याचे आदेश जारी केले.

**प्रकल्पाचे स्वरूप आणि बड्या व्यक्तींचे फ्लॅट्स**

रुस्तमजी क्राउन या प्रकल्पात ६३ मजल्यांचे ३ गगनचुंबी टॉवर्स असून, त्यापैकी २ टॉवर्सना पालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) मिळालेले आहे.

**नेत्यांशी संबंधित घरे**

कारवाईच्या कक्षेत आलेल्या फ्लॅट्समध्ये राज्याचे कॅबिनेट मंत्री संजय राठोड आणि त्यांच्या पत्नी यांच्या नावावरील फ्लॅटचा समावेश असल्याचे सांगितले जाते.

**माजी मंत्री व आमदारांचे कुटुंबीय**

माजी मंत्री दीपक केसरकर ज्या फ्लॅटमध्ये दरमहा ४.२० लाख रुपये भाडे देऊन राहतात, त्या फ्लॅटसह आमदार सदा सरवणकर यांचे सुपुत्र समाधान सरवणकर यांच्या घराचाही यात समावेश असल्याची माहिती आहे.

## थोडक्यात
### मुंबईत पावसाचा कहर! मरीन ड्राईव्ह, अंधेरीत झाडे उन्मळून पडली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** –मुंबईत बुधवारी (दि. १) सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसा सह सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. शहरातील विविध भागांत पाणी साचणे, झाडे उन्मळून पडणे तसेच इमारतीचा भाग कोसळण्याच्या घटना घडल्या. मरीन ड्राइव्ह आणि अंधेरी येथे झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या असून, सुदैवाने या दोन्ही घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मरीन ड्राइव्हवर झाड कोसळल्याने वाहतूक विस्कळीत मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे मरीन ड्राइव्ह परिसरात आज एक मोठे झाड उन्मळून पडले.

## खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या स्थापनेचा मार्ग मोकळा, मंत्रीमंडळाची मंजुरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील आणि भाजपचे सावनेरचे आमदार आशीष देशमुख यांच्याशी संबंधित खासगी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या स्थापनेला आज राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानुसार अहिल्यानगर येथे डॉ. बाळासाहेब विखे-पाटील तर नागपूर येथे लता मंगेशकर विद्यापीठ स्थापन होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अहिल्यानगर येथे डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील फाऊंडेशन या संस्थेने आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव दिला होता. या विद्यापीठाकडे वैद्यक विद्या शाखेतील पदवी, पदव्युत्तर आणि सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम शिकवण्याची व्यवस्था आहे. तसेच सर्व सुविधांनी युक्त असे ८३० खाटांचे रुग्णालयदेखील आहे, तर नागपूर येथे व्ही.एस.पी.एम. ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन या संस्थेने खासगी आरोग्य विद्यापीठ स्थापनेचा प्रस्ताव दिला होता.

## दुर्घटनेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय समिती गठीत : आठ दिवसात अहवाल मिळताच दोषींवर कठोर कारवाई करणार : प्रकाश आबिटकर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा स्त्री रुग्णालयातील अतिदक्षता विभागात आग लागून ३ नवजात बालके मृत्युमुखी पडल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेच्या चौकशीसाठी सात सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. येत्या ८ दिवसात ही समिती अहवाल सादर करणार आहे. यात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, कोणाचीही गय केली जाणार नाही, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब



कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी येथे दिली.

जिल्हा स्त्री रुग्णालयातील दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी दुर्घटना घडलेल्या एनआयसीयूला भेट देऊन पाहणी केली. यावेळी आमदार सुलभा खोडके, महापौर श्री. चंद तेजवानी, आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, विभागीय आयुक्त नयना गुंडे, आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, जिल्हाधिकारी आशिष येरेकर उपस्थित होते. या घटनेचे नेमके कारण शोधून यापुढे अशी घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी आरोग्य विभागाचे आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत महाराष्ट्र विद्युत महामंडळाचे मुख्य अभियंते, एम्सचे वरिष्ठ अधिकारी, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश असणार आहे. येत्या आठ दिवसात घटनेचा सखोल तपास करून प्रत्यक्ष जबाबदार असलेल्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. ही समिती समस्येच्या खोलवर जाऊन कारणे शोधणार आहे. व्हेंटिलेटर, वीज यंत्रणेतील दोष, फायर ऑडिट, तसेच अन्य अनियमितता यांची सखोल तपासणी करेल. या दुर्दैवी घटनेतून यंत्रणेलाही शिकावे लागेल. ज्या त्रुट्या आढळून येतील त्या दुरुस्त करण्यासाठी शासन संपूर्ण प्रयत्न करेल. तसेच या घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या नवजात बालकांच्या पालकांना शासनातर्फे पाच लाख रूपये आर्थिक मदत देण्यात येईल. तसेच जखमी बालकांवर उपचाराचा खर्च शासनाकडून करण्यात येईल. आजच्या घटनेने गांभीर्य लक्षात घेऊन शासकीय तसेच खासगी रुग्णालयातील फायर ऑडिट नियमानुसार व नियमीत होण्यासाठी मुंबई येथे मंत्रालयात संबंधित यंत्रणांच्या प्रमुखांशी चर्चा करण्यात येईल. तसेच आवश्यक सूचना सर्व रुग्णालयांना देण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान आरोग्य मंत्री आबिटकर यांनी डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाला भेट देऊन उपचार घेत असलेल्या दुर्घटनेतील नवजात बालकांच्या प्रकृतीची माहिती घेतली.

## ध्रुव जुरेलचे 'जय जवान, जय किसान' सेलिब्रेशन व्हायरल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – श्रीलंकेविरुद्ध कोलंबो येथे खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताचा यष्टीरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलने शानदार शतकी खेळी साकारली आहे. सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या जुरेलने ९ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने नाबाद ११५ धावांची खेळी केली. दुसऱ्या दिवशी शतक पूर्ण केल्यानंतर त्याने केलेल्या एका अनोख्या सेलिब्रेशनने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

जुरेलच्या दंडावर 'जय जवान, जय किसान' असा टॅटू कोरलेला आहे. शतक पूर्ण झाल्यावर त्याने हेल्मेट काढून मैदानावर आनंद साजरा केला आणि त्यानंतर जर्सी वर करून हातावरील लाल बहादूर शास्त्री यांचा हा ऐतिहासिक नारा सर्वांना दाखवला. त्याचा हा अंदाज सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

दिवसाचा खेळ संपल्यानंतर मीडियाशी बोलतांना ध्रुव जुरेलने या सेलिब्रेशनमागील खास रहस्य उघड केले. ध्रुव जुरेलचे वडील भारतीय सैन्यात जवान होते आणि त्यांनी १९९९ च्या कारगिल युद्धात देशसेवा केली आहे. याआधीही त्याने वडिलांसाठी 'सॅल्यूट' मारून शतक साजरे केले होते. मात्र, यावेळी हे सेलिब्रेशन फक्त वडिलांसाठीच नव्हे तर त्याच्या आजोबांसाठीही होते. जुरेल म्हणाला, 'माझे आजोबा शेतकरी होते आणि माझे वडील सैनिक आहेत. मला माझ्या मुळाची आठवण ठेवायची आहे आणि मी कुठून आलोय हे विसरायचे नाही. हे शतक आणि सेलिब्रेशन पूर्णपणे माझ्या आजोबा आणि वडिलांना समर्पित आहे.'



# न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या विद्यार्थीनींकडून स्वतः तयार केलेल्या राख्या सैनिकांसाठी रवाना

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे आनंददायी शनिवार उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने, पुनर्वापर करून आकर्षक राख्या तयार केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना सर्जनशीलतेला आणि



पर्यावरण पूरक विचारांना चालना देणाऱ्या या उपक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या सुंदर व नाविन्यपूर्ण राख्यांचे प्रदर्शन आणि विक्री आयोजित करण्यात आली. या माध्यमातून टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ उपयुक्त वस्तू तयार करण्याचा संदेश जिजाऊ पथक गाईड विद्यार्थ्यांनी दिला, तयार केलेल्या राख्यांमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विधायक कार्यासाठी उपयोग करण्यासाठी खरी कमाई हा उपक्रम राबविण्यात आला. याचबरोबर देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय सैनिक बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थिनीने प्रेमाने तयार केलेल्या राख्या सैनिकांना पाठविल्या. देशरक्षणासाठी आपल्या कुटुंबापासून दूर राहून, कर्तव्य बजावणाऱ्या जवानांच्या मनगटावर विद्यार्थ्यांच्या प्रेमाची व शुभेच्छांची राखी पोहचावी, हा या उपक्रमामागील भावनिक व राष्ट्र प्रेमाचा सुंदर संदेश होता. या संपूर्ण उपक्रमातला इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल मधील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व एक नाही अनेक अशा राख्या विद्यार्थ्यांनी तयार करून आणल्या त्यातील उत्कृष्ट तीन विद्यार्थी मिडल विभाग व तीन विद्यार्थी हायस्कूल विभागातून बक्षिसाचे मानकरी ठरले त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मिळून एक अनोखी राखी कल्पकतेचा वापर करून तयार केली जी या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देत त्यांचा उत्साह वाढवणाऱ्या या सन्मान सोहळ्यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आले, उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या सर्जनशीलतेला व सामाजिक बांधिलकीला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाकरिता अध्यक्ष म्हणुन मुख्याध्यापक ए.बी.चौधरी तर प्रमुख अतिथी म्हणुन शिक्षक मेघवींनी बढे, किशोर मांडेकर तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजक ज्योती कोल्हे, शुभांगीनी हेडाऊ व सविता ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन शुभांगीनी हेडाऊ तर आभार ज्योती कोल्हे यांनी केले.

# मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा : राणे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मत्स्यव्यवसाय विभागाचा निधी प्रभावीपणे खर्च होण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजनांच्या माध्यमातून अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावे. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेवर विशेष भर देऊन लाभार्थ्यांची संख्या वाढवावी, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मत्स्यव्यवसाय विभागाच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विविध योजना महा-डीबीटीच्या माध्यमातून ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देऊन नागरिकांना त्यांचा लाभ अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा, याबाबत मंत्रालयात मंत्री राणे यांच्या उपस्थितीत आढावा बैठक झाली. बैठकीस मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार यांच्यासह विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. भूजलाशयीन, निमखारे पाणी आणि सागरी मत्स्यव्यवसायासाठीच्या ६ राज्यस्तरीय, १९ जिल्हास्तरीय आणि ३ योजनांमध्ये सुधारणा अशा एकूण २८ योजनांना मान्यता देण्यात आली आहे. यापैकी ४ राज्यस्तरीय, १८ जिल्हास्तरीय आणि २ योजनांमध्ये सुधारणा अशा एकूण २४ योजनांसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.

# स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत जरूड येथील ३ हजार विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत जरुड येथील अभिनव मित्र परिवार व ग्रुप यांच्या वतीने गावातील विविध शाळांतील सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अभिनव मित्र परिवाराच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याच





परंपरेचा भाग म्हणुन यंदाही स्वातंत्र्यदिनानिमित्त शाळांच्या प्रभातफेरी व मिरवणुकांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वितरण करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी अभिनव मित्र परिवाराचे कौतुक केले.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी विष्णू राऊत, वासुदेव वाडबुदे, हेमंत टोंगसे, दीपक होले, गजानन चव्हाण, संजय जाधव, संजय काळबेंडे, संजय घोरपडे, भारत लांडगे, भावेश पेंडोखरे, योगेश रहाटे, राजेंद्र कुऱ्हाडे, उमेश बाहे, धनराज अंबाडकर, विजय मेश्राम, डॉ.तायडे, डॉ.सुशांत मंडळ, निलेश वाडेकर, अजय राठोड, योगेश बिसांद्रे, प्रमोद मधुने, रमेश चरपे, गोपाल निचित, विजय बिजवे, योगेश फुसे, मिलिंद चौबे, कैलास चरपे, हर्षाल मोरसकर, सुनील अकोलकर, विजय लेव्हलकर, विनोद बाबुलकर, संजय मामले यांच्यासह सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# पर्यावरणपूरक सौरऊर्जेवर आधारित आधुनिक प्रवासी बोटींच्या वापराला चालना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील जलवाहतूक व्यवस्था अधिक सुखकर, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी करून सौर ऊर्जेच्या माध्यमातून जलवाहतुकीला चालना देण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात मंत्री राणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीस महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्रातील जलवाहतुकीसाठी अद्ययावत सोलार तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी बोटी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नावाल्ट बोटसब कंपनीकडून सादरीकरण करण्यात आले. सौरऊर्जेसह विविध आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित बोटींची माहिती देण्यात आली. सौरऊर्जेवर आधारित बोटींच्या वापरामुळे पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी होऊन जलवाहतूक अधिक पर्यावरणपूरक करण्यास मदत होणार आहे. तसेच प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी जलप्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे.

# पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ६२८ उमेदवारांची प्राथमिक निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**परतवाडा** – जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडल करिअर सेंटर अमरावती यांनी परतवाडा येथील कोर्ट रोड स्थित कल्याण मंडपम मध्ये आयोजित केलेल्या पं.दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात विविध कंपन्यांनी प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे एकूण ६२८ उमेदवारांची प्राथमिक निवड केली आहे.

या रोजगार मेळाव्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन माध्यमातून ८०६ उमेदवारांनी नोंदणी केली. यातील ७७७ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती दिल्या. महिंद्रा अँड महिंद्रा प्रा.ली.नागपूर, जाधव गियर्स ली.अमरावती, वैभव एन्टरप्राईजेस प्रा.लि.नागपूर, जाबील सर्किट इंडिया प्रा.लि. पुणे, नवभारत फर्टिलायझर प्रा.लि. नागपूर, बीव्हीजी पुणे, कोअर प्रोजेक्ट इंजिनियर अमरावती,धूत ट्रान्समिशन प्रा.लि., श्रीराम फायनान्स, ब्लिंकिट, कृपा कन्सल्टनसी पुणे, प्रिसिजन मॅपिंग सोल्युशन अमरावती यांच्याकडून थेट मुलाखती घेण्यात येणार आहे. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत गट विकास अधिकारी, पंचायत समिती अचलपूर, नगरपरिषद अचलपूर, सार्वजनिक बांधकाम विभाग अचलपूर, शासकीय तंत्रनिकेतन अचलपूर आदी १६ कंपन्या व कार्यालयांच्या प्रतिनिधींनी या रोजगार मेळाव्यात सहभागी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेवून विविध पदांसाठी ६२८ उमेदवारांची प्राथमिक निवड केली आहे.

आमदार प्रवीण तायडे यांच्या हस्ते या रोजगार मेळाव्याचे उदघाटन झाले राज्यस्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. रणजीत पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर आमदार केवलराम काळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्राजक्ता राऊत तर जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आभार मानले.

# काटी जि.प.शाळेच्या विद्यार्थिनींचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हा परिषद शाळा काटी येथील इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी सोनाली अनिल घोरपडे व पंखुडी राजकुमार दंडाळे यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करुन शैक्षणिक गुणवत्तेत मानाचा तुरा रोवला. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते दोन्ही गुणवंत विद्यार्थिनींचा गुणगौरव करण्यात आला.

यावेळी विद्यार्थिनी, त्यांचे पालक तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक करण्यात आले. विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती परीक्षेच्या




तयारीसाठी कांचन कुटे यांनी विशेष मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींना हे यश संपादन करता आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान मुख्याध्यापक संजय फुटाणे होते. यावेळी सहकारी शिक्षिका सुनीता वानखडे व संगीता काहाते उपस्थित होत्या. स्वातंत्र्यदिनाच्या या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. संचालन सुनीता वानखडे तर याप्रसंगी मुख्याध्यापक संजय फुटाणे यांनी मार्गदर्शन केले? दोन्ही विद्यार्थिनींच्या या यशामुळे शाळेच्या शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त

# न्यायालय परिसरात१७२ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुका विधी सेवा समिती वरुड यांच्या वतीने राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त जिल्हा न्यायालय-२, वरुड येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण १७२ ज्येष्ठ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ





घेतला. शिबिरात न्यायालयात येणारे पक्षकार, वकील, न्यायिक अधिकारी व कर्मचारी, पोलीस कर्मचारी, वाहतूक पोलीस तसेच न्यायालय परिसरातील ज्येष्ठ नागरिक महिला व पुरुषांची विविध आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालय येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.महेंद्र राऊत, पुनर्वसन अधिकारी डॉ.रुपेश महाजन, डॉ.पंकज केचे, समुपदेशक कालिदास उपरे, प्रयोगशाळा तज्ज्ञ ज्योती पांडे तसेच फिजिओथेरपिस्ट अंकिता घाटोळे यांच्यासह वैद्यकीय पथकाने सेवा दिली.

कार्यक्रमाला जिल्हा न्यायाधीश-२ तथा तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष अ.अ.पंचभाई यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणुन दिवाणी न्यायाधीश बी.बी.गजुरकर, तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.ए.आर.घाटोळे, ॲड.डी.पी.सदापुरे, वकील संघाचे सदस्य, न्यायालयीन कर्मचारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून ज्येष्ठांच्या आरोग्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासोबतच त्यांना आवश्यक वैद्यकीय सल्लाही देण्यात आला.

# उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाची जनजागृती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा २.०) अंतर्गत उपविभागीय कृषी अधिकारी, मोर्शी यांच्या मार्गदर्शनाखाली आखतवाडा येथे जलसंधारण दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद उर्दू माध्यमिक शाळेतील विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या सहभागातून जलसंधारण व पाणी बचतीबाबत जनजागृती करण्यात आली.

यावेळी निबंध स्पर्धा, श्रमदान, गावातील अस्तित्वातील जलसंधारण संरचनांची पाहणी तसेच मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. बदलते हवामान,





पावसातील अनियमितता आणि जमिनीतील घटणारी पाणीपातळी या विषयांवर एनआरएम समन्वयक योगेश बारबुधे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. जलसंधारणाच्या माध्यमातून शेती समृद्ध करण्यासाठी प्रत्येकाने पाणी अडवून ते जमिनीत जिरविण्याचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला सरपंच गुलाम रसूल गुलाम मुस्ताफ, मुख्याध्यापक आसिफ इकबाल, शिक्षक अजहर हुसेन, अजहर अहमद, मोहम्मद मोहसीन, तंत्रज्ञान समन्वयक एस.एन.गोफणे, मृद व जलसंधारण समन्वयक वाय.ए.बारबुधे, सहाय्यक कृषी अधिकारी नवले, समूह सहाय्यक एस.ए.थोरात तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात 'चला माती अडवु या, पाणी वाचवु या', 'पाणी अडवू या – पाणी जिरवू या' आणि 'थेंब थेंब साठवू या, भविष्यातील पाणी वाचवू या' या घोषणांद्वारे जलसंधारणाचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

# संपादकीय

## परिस्थिती कितीही कठीण असो, मेहनत आणि संयम सोडू नका

### डफरीन रुग्णालयातील आग : नवजात जीवांच्या मृत्यूने आरोग्य व्यवस्थेच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालय अर्थात डफरीन रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या दुर्घटनेत तीन नवजात बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर इतर अनेक बालकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास एनआयसीयूमध्ये व्हेंटिलेटरमधून ठिणगी पडल्याने आग लागल्याचे सांगितले जात आहे. प्रशासनाने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

ही केवळ एका रुग्णालयातील आग नाही; ही आपल्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या सुरक्षिततेची कठोर परीक्षा आहे. रुग्णालयात उपचारासाठी येणारा प्रत्येक रुग्ण स्वतःला आणि आपल्या कुटुंबीयांना सुरक्षित हातात सोपवतो. विशेषतः एनआयसीयूमधील नवजात बालके स्वतःच्या जीवासाठी कोणतीही मदत मागू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी रुग्णालय प्रशासन, वैद्यकीय यंत्रणा आणि शासनावर अनेक पटींनी अधिक असते.

आगीचे नेमके कारण चौकशीतून स्पष्ट होईल. त्यामुळे दोष निश्चित होण्यापूर्वी कोणावरही आरोप करणे योग्य ठरणार नाही. मात्र, या दुर्घटनेने काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणांची नियमित तपासणी किती काटेकोरपणे होते? व्हेंटिलेटर, ऑक्सिजन यंत्रणा, विद्युत व्यवस्था आणि अग्निशमन साधनांची देखभाल कोणत्या पद्धतीने केली जाते? आपत्कालीन परिस्थितीत नवजात बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी पुरेशी प्रशिक्षित मनुष्यबळ आणि पर्यायी व्यवस्था आहे का? हे प्रश्न आता केवळ अमरावतीपुरते मर्यादित राहता कामा नयेत.

प्रशासनाने रुग्णालयात नियमित अग्निसुरक्षा ऑडिट झाल्याचे सांगितले असून, या वर्षीच्या ऑडिटसाठीही अर्ज करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे चौकशीचा केंद्रबिंदू केवळ 'फायर ऑडिट झाले की नाही' एवढाच नसावा; तर ऑडिटमध्ये कोणत्या त्रुटी आढळल्या, त्यावर प्रत्यक्षात कोणती कार्यवाही झाली आणि वैद्यकीय उपकरणांच्या देखभालीची नोंद किती अद्ययावत होती, याचाही सखोल तपास झाला पाहिजे.

रुग्णालयातील आग ही सामान्य इमारतीतील आगीपेक्षा अधिक धोकादायक असते. येथे रुग्ण स्वतःहून पळून जाऊ शकत नाहीत. नवजात बालके, अतिदक्षता विभागातील रुग्ण, वृद्ध आणि गंभीर अवस्थेतील रुग्ण यांना हलविण्यासाठी वेळ, प्रशिक्षित कर्मचारी आणि योग्य उपकरणे आवश्यक असतात. त्यामुळे रुग्णालयांच्या अग्निसुरक्षेकडे केवळ कागदोपत्री प्रमाणपत्र म्हणून पाहण्याची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. या दुर्घटनेत स्वतःच्या जीवाची पर्वा न करता बालकांना वाचविण्यासाठी धाव घेणाऱ्या परिचारिका व कर्मचाऱ्यांचे धैर्य निश्चितच कौतुकास्पद आहे. संकटाच्या क्षणी आरोग्य कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता अनेक जीव वाचवू शकते. मात्र, एखाद्या कर्मचाऱ्याच्या धैर्यावर संपूर्ण सुरक्षा व्यवस्था अवलंबून राहता कामा नये. व्यवस्था अशी असली पाहिजे की आग लागल्यानंतर जीव वाचविण्यासाठी संघर्ष करण्याची वेळच कमीतकमी यावी. या घटनेनंतर महाराष्ट्रातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांची सुरक्षा व्यवस्था पुन्हा तपासण्याची आवश्यकता आहे. विशेषतः एनआयसीयू, आयसीयू, ऑपरेशन थिएटर आणि ऑक्सिजनवर अवलंबून असलेल्या विभागांचे स्वतंत्र सुरक्षा ऑडिट झाले पाहिजे. वैद्यकीय उपकरणांच्या मेंटेनन्सचा डिजिटल रेकॉर्ड, विद्युत यंत्रणेची नियमित तपासणी, स्मोक डिटेक्टर, अलार्म, अग्निशमन यंत्रणा आणि आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग प्रत्यक्ष कार्यरत आहेत की नाहीत, याची तपासणी व्हावी. तसेच, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना नियमित अग्निशमन व आपत्कालीन स्थलांतराचे प्रशिक्षण देणे बंधनकारक केले पाहिजे. केवळ अग्निशमन यंत्रे भिंतीवर लावून सुरक्षा पूर्ण होत नाही. संकटाच्या क्षणी कोणती व्यक्ती काय करणार, कोणत्या मार्गाने रुग्ण हलवले जाणार, ऑक्सिजन व वीजपुरवठा कसा नियंत्रित केला जाणार आणि नवजात बालकांना कोणत्या पद्धतीने सुरक्षित हलवायचे, याचे प्रत्यक्ष मॉक ड्रिल होणे आवश्यक आहे. सरकारने मृत बालकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत जाहीर केली आहे; ती आवश्यक आणि संवेदनशील पाऊल आहे. परंतु कोणतीही आर्थिक मदत गेलेले लेकरू परत आणू शकत नाही. त्यामुळे या मदतीसोबतच दोष आणि त्रुटींची जबाबदारी निश्चित करून भविष्यात अशी दुर्घटना होणार नाही, यासाठी ठोस उपाययोजना करणे ही खरी श्रद्धांजली ठरेल.

* पुण्यस्मरण दिन विशेष

# शौर्य, त्याग आणि देशभक्तीचे प्रतीक : शहीद मेजर दुर्गा मल्ला

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अनेक वीरांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देशाच्या स्वातंत्र्याचा मार्ग प्रशस्त केला. त्यापैकीच एक तेजस्वी आणि प्रेरणादायी नाव म्हणजे शहीद मेजर दुर्गा मल्ला. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामात त्यांनी दाखवलेले अदम्य धैर्य, देशनिष्ठा आणि बलिदान आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे.

दुर्गा मल्ला यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी दार्जिलिंग परिसरातील डुंग्रा, माटीगडा येथे झाला. ते मूळचे गोरखा समाजातील होते. लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये देशप्रेमाची भावना प्रबळ होती. ब्रिटिश राजवटीविरुद्ध देशात सुरू असलेल्या स्वातंत्र्यलढ्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

आझाद हिंद सेनेत प्रवेश

दुर्गा मल्ला यांनी ब्रिटिशांच्या सैन्यात राहून त्यांची सेवा करण्याऐवजी भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा मार्ग स्वीकारला. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेत त्यांनी प्रवेश केला. त्यांना गुप्तचर विभागात महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली. आझाद हिंद सेनेचे ध्येय स्पष्ट होते भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करणे. या ध्येयासाठी दुर्गा मल्ला यांनी आपले आयुष्य देशाला समर्पित केले. शत्रूच्या हालचालींची माहिती मिळवणे, ती योग्य ठिकाणी पोहोचवणे आणि स्वातंत्र्याच्या लढ्याला बळ देणे, अशा अत्यंत धोकादायक जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या.

**देशासाठी जीवाची बाजी**

दुर्गा मल्ला यांच्या कार्यात धैर्याबरोबरच अत्यंत मोठा धोका होता. ब्रिटिश सैन्याने त्यांना पकडले. चौकशीदरम्यान त्यांच्यावर अनेक प्रकारचे दबाव आणण्यात आले.



आझाद हिंद सेनेशी संबंधित माहिती उघड करण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला; मात्र त्यांनी देशाशी आणि आपल्या सहकाऱ्यांशी कोणतीही प्रतारणा केली नाही.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी मृत्यूला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला. अखेर २५ ऑगस्ट १९४४ रोजी दिल्लीच्या सेंट्रल जेलमध्ये त्यांना फाशी देण्यात आली. मृत्यूच्या क्षणीही त्यांची देशनिष्ठा अढळ राहिली.

बलिदानाची अमर गाथा

दुर्गा मल्ला यांचे बलिदान हे केवळ एका सैनिकाचे बलिदान नव्हते; ते भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या असंख्य ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांच्या त्यागाचे प्रतीक आहे. त्यांनी स्वतःच्या आयुष्यापेक्षा देशाचे स्वातंत्र्य मोठे मानले.

त्यांच्या जीवनातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो देशभक्ती ही केवळ शब्दांत व्यक्त करण्याची गोष्ट नसून, देशासाठी त्याग करण्याची तयारी असणे म्हणजे खरी देशभक्ती.

दुर्गा मल्ला यांची गोरखा समाजातील ओळखही विशेष महत्त्वाची आहे. त्यांच्या शौर्यामुळे गोरखा समाजातील देशभक्तीची परंपरा अधिक ठळकपणे समोर आली. भारतीय सैन्यातील गोरखा जवानांच्या शौर्याची परंपरा आजही अभिमानाने सांगितली जाते आणि दुर्गा मल्ला हे त्या परंपरेतील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरतात.

आजच्या पिढीसाठी प्रेरणा

आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेत आहोत. हे स्वातंत्र्य सहज मिळालेले नाही. असंख्य क्रांतिकारकांनी तुरुंगवास भोगला, यातना सहन केल्या आणि हजारो वीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. मेजर दुर्गा मल्ला यांचे नाव त्या बलिदानाच्या इतिहासात सदैव आदराने घेतले जाईल.

त्यांच्या पुण्यस्मरणदिनी केवळ त्यांना श्रद्धांजली वाहणे पुरेसे नाही. त्यांच्या जीवनातील देशप्रेम, निष्ठा, धैर्य, शिस्त आणि त्याग हे गुण आत्मसात करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. मेजर दुर्गा मल्ला यांचे बलिदान भारताच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातील अमूल्य ठेवा आहे. त्यांच्या शौर्याची गाथा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

शतशः नमन!

शहीद मेजर दुर्गा मल्ला अमर राहोत!

# चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा मानव : नील आर्मस्ट्राँग

मानवाच्या इतिहासातील काही क्षण असे असतात, जे संपूर्ण मानवजातीच्या प्रगतीचे प्रतीक बनतात. २० जुलै १९६९ हा असाच एक ऐतिहासिक दिवस. या दिवशी अमेरिकन अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्राच्या पृष्ठभागावर पहिले मानवी पाऊल ठेवले आणि मानवाने पृथ्वीच्या पलीकडे आपल्या अस्तित्वाची पहिली ठोस छाप उमटवली.

नील आर्मस्ट्राँग यांचा जन्म ५ ऑगस्ट १९३० रोजी अमेरिकेतील ओहायो राज्यातील वॅपाकोनेटा येथे झाला. लहानपणापासूनच त्यांना विमान उड्डाण आणि आकाशाबद्दल विलक्षण आकर्षण होते. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी त्यांनी पहिल्यांदा विमानप्रवास केला आणि त्यानंतर त्यांच्या मनात आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न निर्माण झाले.

**वैमानिक म्हणून कारकीर्द**

आर्मस्ट्राँग यांनी एरोनॉटिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले. त्यानंतर ते अमेरिकन नौदलात वैमानिक म्हणून दाखल झाले. कोरियन युद्धाच्या काळात त्यांनी लढाऊ वैमानिक म्हणून काम केले आणि अनेक धोकादायक मोहिमांमध्ये सहभाग घेतला.

नंतर त्यांनी नासामध्ये अंतराळवीर म्हणून प्रवेश केला. अत्यंत कठीण प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्य आणि संकटसमयी शांतपणे निर्णय घेण्याची क्षमता यामुळे ते नासाच्या अत्यंत विश्वासार्ह अंतराळवीरांपैकी एक बनले.

**अपोलो-११ मोहिमेचा ऐतिहासिक प्रवास**

१९६९ मध्ये अमेरिकेने चंद्रावर मानव पाठविण्याच्या महत्त्वाकांक्षी अपोलो-११ मोहिमेची तयारी केली. या मोहिमेसाठी नील आर्मस्ट्राँग यांची कमांडर म्हणून निवड झाली. त्यांच्यासोबत बझ ऑल्ड्रिन आणि मायकेल कॉलिन्स हे अंतराळवीर होते. १६ जुलै १९६९ रोजी अपोलो-११ अवकाशात झेपावले. पृथ्वीपासून लाखो किलोमीटरचा प्रवास करून अंतराळयान चंद्राच्या कक्षेत पोहोचले. त्यानंतर आर्मस्ट्राँग आणि ऑल्ड्रिन यांनी 'ईगल' या लूनर मॉड्यूलमधून चंद्राच्या पृष्ठभागाकडे प्रस्थान केले तर मायकेल कॉलिन्स मुख्य अंतराळयानात चंद्राभोवती कक्षेत राहिले.

चंद्रावर उतरताना परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक होती. नियोजित



ठिकाणी अडथळे असल्याचे लक्षात आल्यानंतर आर्मस्ट्राँग यांनी स्वतः निर्णय घेत 'ईगल' सुरक्षित ठिकाणी उतरवले. अखेर २० जुलै १९६९ रोजी मानवाने प्रथमच चंद्राच्या पृष्ठभागाला स्पर्श केला.

**मानवासाठी एक मोठे पाऊल**

चंद्रावर उतरल्यावर नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्राच्या पृष्ठभागावर पहिले पाऊल ठेवले. त्या क्षणी त्यांनी उच्चारलेले शब्द जगाच्या इतिहासात अजरामर झाले.

या घटनेचे महत्त्व केवळ अमेरिकेच्या अंतराळ विजयापुरते मर्यादित नव्हते. हे संपूर्ण मानवजातीच्या वैज्ञानिक प्रगतीचे प्रतीक होते. पृथ्वीवर जन्मलेल्या मानवाने प्रथमच दुसऱ्या खगोलीय पिंडावर पाऊल ठेवले होते.

आर्मस्ट्राँग आणि ऑल्ड्रिन यांनी चंद्रावर सुमारे अडीच तास विविध वैज्ञानिक प्रयोग केले, नमुने गोळा केले आणि उपकरणे स्थापित केली. त्यानंतर ते सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले. अपोलो-११ मोहिमेचे यश हे विज्ञान, तंत्रज्ञान, नियोजन आणि मानवी धैर्य यांचा अभूतपूर्व संगम होते.

**प्रसिद्धीपासून दूर राहणारा महानायक**

चंद्रावर पहिले पाऊल ठेवूनही नील आर्मस्ट्राँग यांनी प्रसिद्धीच्या झोतात राहणे पसंत केले नाही. त्यांनी नासामधील कार्यकाळानंतर अध्यापन आणि अभियांत्रिकी क्षेत्रात योगदान दिले. अंतराळवीर म्हणून मिळालेल्या अभूतपूर्व प्रसिद्धीपेक्षा ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काम करण्याला त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यांचा स्वभाव अत्यंत साधा आणि विनम्र होता. ऐतिहासिक कामगिरी करूनही त्यांनी स्वतःला 'नायक' म्हणून मिरवले नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही नम्रता त्यांच्या महानतेला अधिक उंची देते.

**निधन आणि अमर वारसा**

नील आर्मस्ट्राँग यांचे २५ ऑगस्ट २०१२ रोजी वयाच्या ८२व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने अंतराळ संशोधनाच्या इतिहासातील एक महान व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. मात्र, त्यांनी चंद्रावर उमटवलेले पहिले मानवी पाऊल आजही मानवाच्या जिज्ञासा, धाडस आणि वैज्ञानिक क्षमतेचे प्रतीक आहे. नील आर्मस्ट्राँग यांची कहाणी आपल्याला शिकवते की मोठी स्वप्ने पाहण्याचे धाडस आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम करण्याची तयारी असेल, तर अशक्य वाटणारे ध्येयही साध्य होऊ शकते.

आज मानव मंगळावर जाण्याची स्वप्ने पाहत आहे, चंद्रावर कायमस्वरूपी संशोधन केंद्र उभारण्याचा विचार करत आहे आणि अंतराळाच्या अधिक खोल भागाचा शोध घेत आहे. या सर्व प्रवासाच्या इतिहासात नील आर्मस्ट्राँग यांनी उघडलेले पहिले दार सदैव स्मरणात राहील. चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा तो क्षण मानवजातीच्या इतिहासातील एक अमर क्षण आहे. नील आर्मस्ट्राँग यांचे नाव विज्ञान, साहस आणि मानवी स्वप्नांच्या इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.


महान अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांना पुण्यस्मरणदिनी विनम्र अभिवादन!

# मखदूम मोहिउद्दीन : क्रांती, साहित्य आणि मानवतेचा बुलंद आवाज

भारतीय स्वातंत्र्यलढा, सामाजिक परिवर्तन आणि साहित्यिक चळवळीच्या इतिहासात मखदूम मोहिउद्दीन हे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ते केवळ उर्दू भाषेतील श्रेष्ठ कवी नव्हते, तर स्वातंत्र्यसैनिक, कामगार चळवळीचे नेते आणि समाजवादी विचारांचे प्रभावी प्रवक्ते होते. त्यांच्या कवितेत प्रेम, सौंदर्य, शोषितांच्या वेदना आणि सामाजिक परिवर्तनाची आस यांचा अनोखा संगम दिसून येतो. मखदूम मोहिउद्दीन यांचा जन्म ४ फेब्रुवारी १९०८ रोजी तत्कालीन हैदराबाद संस्थानातील अंदोल, मेदक येथे झाला. अत्यंत साध्या परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी शिक्षण घेतले आणि पुढे साहित्य व सामाजिक कार्याला आपल्या जीवनाचे ध्येय बनवले.

**साहित्याकडे वाटचाल**

मखदूम यांना लहानपणापासूनच कविता आणि साहित्याची आवड होती. त्यांच्या लेखनावर तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा मोठा प्रभाव पडला. त्यांच्या कवितेत केवळ प्रणयभावना नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनातील संघर्ष आणि अन्यायाविरुद्धचा आवाजही ठळकपणे उमटतो. त्यांचा 'सुरख सवेरा' हा काव्यसंग्रह उर्दू साहित्यात विशेष महत्त्वाचा मानला जातो. त्यांच्या



कवितांमध्ये प्रेम आणि क्रांती हे परस्परविरोधी नसून मानवी जीवनाच्या दोन महत्त्वाच्या बाजू आहेत, अशी भूमिका जाणवते. त्यामुळेच त्यांच्या कवितेला तरुणाईपासून कामगार आणि सामान्य जनतेपर्यंत व्यापक प्रतिसाद मिळाला.

**स्वातंत्र्यलढा आणि सामाजिक चळवळ**

मखदूम मोहिउद्दीन यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्धच्या स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला. पुढे त्यांनी हैदराबादमधील निजामशाहीच्या विरोधातील जनआंदोलनातही सक्रिय भूमिका बजावली. कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. कामगारांना योग्य वेतन, सन्मान आणि न्याय मिळावा यासाठी त्यांनी संघटनात्मक पातळीवर काम केले. शोषित आणि वंचित समाजघटकांच्या प्रश्नांना त्यांनी आपल्या साहित्याइतकेच महत्त्व दिले.

त्यांच्या विचारांवर समाजवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव होता. समाजातील आर्थिक विषमता, अन्याय आणि शोषण याविरोधात त्यांनी आवाज उठवला. त्यामुळे त्यांचे साहित्य हे केवळ मनोरंजन करणारे साहित्य न राहता सामाजिक जाणीव निर्माण करणारे साहित्य ठरले.

**प्रेम आणि क्रांतीचा कवी**

मखदूम यांच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील प्रेमभावना आणि सामाजिक परिवर्तनाची तळमळ. त्यांच्या रचनांमध्ये प्रिय व्यक्तीचे सौंदर्य जितक्या उत्कटतेने येते, तितक्याच ताकदीने गरीब, कामगार आणि शोषितांच्या जीवनातील वेदनाही व्यक्त होतात. त्यांच्या काव्यातून एक असा संदेश सातत्याने उमटतो की, समाजात खरी शांतता आणि सुंदर भविष्य निर्माण करायचे असेल तर अन्यायाविरुद्ध उभे राहावे लागेल. म्हणूनच मखदूम मोहिउद्दीन यांना 'क्रांतीचा कवी' आणि 'प्रेमाचा कवी' अशी दुहेरी ओळख मिळाली.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# साखरेसंदर्भात राजू शेटटी यांचे मोदींना पत्र

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – देशभरात वाढलेल्या साखरेच्या दरावरुन शेतकरी नेतेही आक्रमक झाले आहेत. कारण, एकीकडे दरवाढीने सर्वसामान्य ग्राहक संतापला असून दुसरीकडे दरवाढीचा शेतकऱ्यांना फायदा होत नसल्याने शेतकरीही चिडले आहेत. साखरेचं दर वाढले आहेत, त्याचा फायदा शेतकऱ्यांना झाला असता तर आम्हाला आनंद झाला असता. केंद्र सरकारने १० लक्ष टन साखर आयात करण्याचा निर्णय घेतला, आता आयात करण्यात आलेली साखर ऑक्टोबरमध्ये येणार, त्याच काळात साखर करखाने सुरू होणार, त्यामुळे दर कोसळणार, असे म्हणत केंद्र सरकारच्या धोरणावर शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी नाराजी दर्शवली आहे. राजू शेट्टी यांनी साखरेच्या वाढलेल्या दरासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्रही लिहिले आहे.

# अमरावती आगीजनीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या समवेत आ. सुलभा खोडके यांची पाहणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या एनआयसीयू मध्ये सोमवारी पहाटेच्या ४ च्या सुमारास आग लागून तीन नवजात बालकांचा दुदैवी मृत्यू झाल्याची माहिती मिळताच आमदार सुलभा संजय खोडके यांनी तात्काळ डफरीन मध्ये पोहोचवून परिस्थिती जाणून घेतली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री ना. प्रकाशजी





आबिटकर यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांना घटनेसंदर्भात अवगत केले. दरम्यान आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर हे दुपारी डफरीन रुग्णालय येथे पोहोचले असता आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी मंत्रीमहोदयांसमवेत एनआयसीयू कक्षाची पाहणी केली. तसेच शहरातील खाजगी रुग्णालय रेफर करण्यात आलेल्या नवजात बालकांची सुद्धा पाहणी करून सर्व नवजात बालकांच्या आरोग्यासंदर्भात पूर्ण खबरदारी व दक्षता बाळगण्याचे निर्देश दिले.

या संदर्भात आमदार सुलभा खोडके यांनी प्रतिक्रिया देतांना सांगितले कि, जिल्हा स्त्री रुग्णालयातील एनआयसीयूमध्ये आग लागून तीन नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत गंभीर व दुदैवी आहे. नेमकी आग कशी लागली हे सद्यातरी सांगणे शक्य नसून निश्चितच संबधित प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने हि घटना घडण्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न झाले आहे. आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्यासमवेत घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असता, आगीचे स्वरूप अत्यंत तीव्र व भीषण असल्याचे सुद्धा दिसत असल्याने या प्रकरणाची सखोल व उच्चस्तरीय चौकशी करण्याचे निर्देश मंत्रिमहोदयांनी दिले आहेत. यासाठी आरोग्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली असून आठ दिवसांत समितीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही निश्चितपणे केली जाईल. दरम्यान घटनेबाबत उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा पवार यांना देखील अवगत करण्यात आले आहे, उपमुख्यमंत्री महोदया सुद्धा या प्रकरणात गांभीर्याने लक्ष देऊन असल्याने या प्रकरणाची अत्यंत सखोल व पारदर्शक चौकशी केली जाणार असल्याचे आमदार सुलभा खोडके यांनी सांगितले.

# मराठीवरील प्रभुत्त्व, निरसीम प्रेमाचा उत्तुंग आदर्श

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रा. यास्मिन शेख यांना भावपूर्ण श्रद्धांजली**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मराठीवरील प्रभुत्व आणि निस्सीम प्रेम याद्वारे भाषाशास्त्रात उत्तुंग आदर्श निर्माण करणाऱ्या विदुषी, व्याकरण तज्ज्ञ, भाषाशास्त्राच्या ज्येष्ठ अभ्यासक प्रा. यास्मिन शेख यांचे निधन शोकदायी असल्याची भावना व्यक्त करून त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, प्रा. शेख यांचा जीवनप्रवास मराठीच्या प्रेमाने भारलेला होता. एखाद्या भाषा शिक्षकाने त्या भाषेवर किती निखळ, प्रांजळ प्रेम करावे याचे प्रा. शेख मूर्तीमंत उदाहरण ठरल्या. शिक्षिका, लेखिका, भाषा शास्त्रातील संशोधन आणि अभ्यासक या नात्याने आयुष्यभर भाषाशास्त्रात रमल्या. मराठी भाषेवर त्यांनी निस्सीम प्रेम केले. यातूनच त्यांनी मराठी व्याकरणात प्रदीर्घ काळ संशोधन केले. अभिजात मराठी भाषेसोबतच, अन्य भारतीय भाषांचाही संशोधक म्हणून अभ्यास केला. अन्य भाषांबाबतही त्या तितक्याच जिव्हाळ्याने मांडणी करत. भाषेचे सौंदर्य खुलवून सांगणारी आणि सौष्ठव समजून देण्याची त्यांची शैली नव्या पिढीलाही भावली. शब्दांचे सौंदर्य आणि व्याकरणदृष्ट्या अचूक वापर याबाबत त्यांनी सहजसोप्या पद्धतीने मांडणी केली. या अंगाने त्यांनी केलेले लेखन, संशोधन मराठी भाषेच्या दृष्टीने अमूल्य ठेवा ठरावे असे आहे. प्रा. शेख यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे नमूद करून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी व्याकरण तज्ज्ञ, भाषाशास्त्राच्या ज्येष्ठ अभ्यासक प्रा. यास्मिन शेख यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# पोलीस स्टेशन हद्दीतील विविध शाळांमध्ये ऑपरेशन कवच अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या ऑपरेशन कवच अंतर्गत नशेला नकार, जीवनाचा स्वीकार या संदेशाच्या माध्यमातून अमली पदार्थांविरोधी जनजागृती करण्यासाठी शेंदुरजनाघाट पोलीस स्टेशन हद्दीतील विविध शाळांमध्ये अंमली पदार्थविरोधी पोस्टर निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

सदर स्पर्धेमध्ये जनता गर्ल्स व जनता हायस्कूल, शेंदुरजनाघाट, शासकीय



आदिवासी आश्रम शाळा वाई खुर्द, प्रेमराज दौलतराव शेळके हायस्कूल वाई खुर्द, प्रभात हायस्कूल पुसला, तसेच जिजामाता हायस्कूल पुसला येथील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम, व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व, युवकांना सकारात्मक संदेश तसेच समाजामध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणारे विविध आकर्षक पोस्टर तयार केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पोस्टरचे परीक्षण करून पोस्टरना क्रमांक देण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला नगराध्यक्ष सुवर्णा वरखेडे, ठाणेदार राहुल गवई, जनता गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका माया हिवसे, नगरसेविका माधुरी माहोरे, नगरसेवक ओमप्रकाश कांडलकर, निलेश फुटाणे, विशाल सावरकर, पवन मोघे, शेख नासीर, विजय चौधरी, इत्तेखार अहमद, नेपाल पाटील, शिक्षक व विद्यार्थी, पोलीस स्टेशनचे कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते. अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन करून युवकांनी व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीत सक्रिय सहभाग घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन कवच या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांविषयी जागरूकता निर्माण करून नशेला नकार, जीवनाचा स्वीकार हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देत तुमची कला, समाजासाठी महत्त्वाचा संदेश या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# आंदोलनाच्या नावाखाली जनतेला वेठीस धरणे थांबवावे : डॉ.ॲड.संदीप ताजने

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वाशिम** – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलनाचे ठिकाण अंतरवाली सराटी ठेवावे की मुंबईतील आझाद मैदान, हा त्यांचा प्रश्न असला तरी आंदोलनाच्या नावाखाली मुंबईसह संपूर्ण राज्यातील जनतेला वेठीस धरणे योग्य नाही, अशी घणाघाती टीका बहुजन समाज पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष डॉ.ऍड.संदीप ताजने यांनी केली. जरांगेचे आंदोलन हे केवळ इतर समाजाचे आरक्षण घालवण्यासाठी आहे का? असा संतप्त सवाल देखील त्यांनी उपस्थित केला.

मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे; मात्र ते देताना ओबीसी समाजाच्या घटनात्मक हक्कांवर कुठलीही गदा येता कामा नये. एका समाजाच्या न्याय्य मागणीचे समर्थन करताना दुसऱ्या समाजाच्या आरक्षणावर अन्याय करणे हा सामाजिक न्यायाचा मार्ग असू शकत नाही, असे डॉ.ऍड.ताजने यांनी स्पष्ट केले.

आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्यांनी आरक्षणाचा इतिहास आणि त्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महापुरुषांच्या विचारांचा गांभीर्याने अभ्यास करावा, असे आवाहनही त्यांनी केले. घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत सकारात्मक भूमिका दर्शविल्याचा दाखला देत, पंजाबराव देशमुख आणि डॉ.आंबेडकर यांच्या भेटीच्या संदर्भातून हा इतिहास समोर येतो असे डॉ.ऍड.ताजने म्हणाले. परंतु, या संपूर्ण आंदोलनात आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले तसेच डॉ.बाबासाहेबांच्या विचारांचे कुठलेही वैचारिक समर्थन आंदोलकांकडून होत असल्याचे दिसून येत नाही.

विद्यमान मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांबद्दल अर्वाच्य भाषा वापरणे हा आंदोलनाचा मार्ग नसून लोकशाही मूल्यांचा

# आता मागे हटणार नाही, आंदोलन होणारच

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन पुन्हा एकदा राज्यातील वातावरण तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीत आंदोलनाला सुरुवात करणार आहेत. दरम्यान, त्यापूर्वी आज सरकारच्या शिष्टमंडळाने यामध्ये मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री उदय सामंत यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी



प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आता मागे हटणार नाही. २९ ऑगस्टला आंदोलन होणारच असल्याची माहिती मनोज जरांगेंनी दिली आहे.

**सरकारच्या शिष्टमंडळासोबत काय झाली चर्चा?**

२९ ऑगस्टपासून मनोज जरांगे पाटील यांचे आंतरवाली सराटीत आंदोलन होणार आहे. ज्या नोंदी शोधल्या आहेत, त्या सर्वांची प्रमाणपत्र २८ ऑगस्टच्या आतमध्ये सरकारनं द्यावी अशी मागणी जरांगे पाटील यांनी केली आहे. आता आंदोलन थांबणार नाही, २९ ऑगस्टला आंदोलन होणार असल्याचे पाटील म्हणाले.

**२८ ऑगस्टच्या आत निर्णयांची अंमलबजावणी करा**

मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सवलतीबाबतचा निर्णय २८ ऑगस्टच्या लागू करा असी मागणी जरांगे पाटील यांनी केली.

## जरुड हायस्कूल व पी.जी.राऊत कनिष्ठ महाविद्यालय येथे

# पालक सभा उत्साहपूर्ण व पालकांच्या सहभागाने संपन्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**जरुड** – श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित जरुड हायस्कूल व पी.जी.राऊत क.म.वि.जरुड येथे प्रथम पालक सभा उत्साहपूर्ण वातावरणात व पालकांच्या उत्स्फूर्त सहभागात संपन्न झाली.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन व हारार्पण करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

पालक सभेदरम्यान विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, नियमित उपस्थिती, अभ्यासातील अडचणी, शिस्त, शैक्षणिक गुणवत्ता व सर्वांगीण विकास या



विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळा व पालक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद व समन्वय असणे आवश्यक असल्याचे अध्यक्षांनी सांगीतले. अध्यक्षस्थावरुन बोलताना प्राचार्य ओमप्रकाश दुपारे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेकडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. पालकांनी शाळेतील शैक्षणिक उपक्रम व विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त करुन भविष्यातही अशा प्रकारच्या पालक-शिक्षक संवादाचे आयोजन करण्यात यावे अशी अपेक्षा व्यक्त केली. पालक सभेचे संचालन व आभार प्रा.एस.के.सोळंके यांनी केले तर यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

**सोने-चांदीचे दर**

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

**कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती**

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | २६५० |
| तूर | ७९०० | ८४७५ |
| मूग | ६५०० | ७२५० |
| उडीद | ६५०० | ७१०० |
| हरभरा | ५८०० | ६२७५ |
| सोयाबिन | ५८५० | ६३५० |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | १०५०० | ११५०० |
| भुईमूग | ६५०० | ७२०० |
| मका | २२०० | २३०० |

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी-टाटा ट्रस्टच्या करारातून 'रुग्णांना' दिलासा

## पहिल्याच करारातून ८९.६० लाखांची मदत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** - यकृत प्रत्यारोपण, कर्करोग आणि मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या महागड्या उपचारांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्ट यांच्यात करण्यात आलेला पहिलाच सामंजस्य करार राज्यातील गरजू रुग्णांसाठी दिलासादायक ठरत आहे. या करारामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळत असून रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये समाधानाची भावना निर्माण



झाली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या करारानंतर अवघ्या सहा महिन्यांत राज्यातील विविध भागांतील ९ रुग्णांना ८९ लाख ६० हजार ३०१ रुपयांचे आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. या मदतीतून यकृत प्रत्यारोपण, कर्करोगावरील उपचार, मेंदूवरील शस्त्रक्रिया यांसारख्या अत्यंत खर्चिक उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तसेच टाटा ट्रस्ट यांच्यामध्ये १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. पहिल्यांदाच झालेल्या या कराराअंतर्गत राज्यातील १५० गरजू रुग्णांना दुर्धर आणि गंभीर आजारावर उपचारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी वैद्यकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारचे करार इतर अनेक नामांकित संस्थांसोबतही प्रक्रियेत असून ते लवकरच पूर्णत्वास येणार आहेत. त्यामुळे राज्यातील अधिकाधिक गरजू रुग्णांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

# 'वनार्टी'च्या प्रशिक्षणासाठी अर्जांना मुदतवाढ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (वनार्टी) मार्फत विमुक्त जाती (व्हिजे-ए) तसेच भटक्या जमाती ब, क व ड (एनटी-बी, एनटी-सी व एनटी-डी) या नॉन-क्रिमीलेअर प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणाची अर्ज प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांचा राज्यभरातून मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता अर्जाची अंतिम मुदत आता २६ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. 'वनार्टी'कडून केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) राज्यसेवा, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (एमईएस) तसेच संयुक्त गट 'ब' व 'क' या स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणासाठी १० ऑगस्टपासून अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. पूर्वी २३ ऑगस्ट ही अर्ज करण्याची अंतिम मुदत होती. विद्यार्थ्यांकडून मिळालेला प्रचंड प्रतिसाद तसेच संस्थेच्या हेल्पलाईनवरून मुदतवाढीच्या सातत्यपूर्ण मागण्या प्राप्त झाल्याने अर्जाची मुदत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती 'वनार्टी'चे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत वावगे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

## अमरावतीच्या घटनेसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडून दुःख व्यक्त

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा स्त्री रुग्णालयात काल रात्री लागलेल्या आगीत तीन बालकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुःखद आणि हृदयद्रावक आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश आरोग्य प्रशासनाला देण्यात आले आहेत. या घटनेतील दोषींवर कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल. आरोग्य मंत्री आणि सचिव दोघांनाही आजच अमरावती येथे भेट देण्यास सांगण्यात आले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येईल. जखमी बालकांवर उपचार शासकीय खर्चाने करण्याचे निर्देशही देण्यात आले.

# ब्राईट स्टार इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

## हर्षल गुल्हाने यांच्या हस्ते ध्वजारोहण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथील गुल्हाने वाडी परिसरातील ब्राईट स्टार इंग्लिश कॉन्व्हेंट मध्ये ७९ वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यालयात आयोजित या विशेष कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा व उपस्थितांचा जोश पाहण्यासारखा होता.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता आणि क्रांतिकारकांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा प्रतिष्ठित नागरिक हर्षल गुल्हाने यांच्या हस्ते दिमाखात ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताच्या सुरेल स्वरांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. ध्वजारोहणानंतर उपस्थितांना मार्गदर्शन करताना हर्षल गुल्हाने यांनी सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. देशस्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांचे हसतमुखाने बलिदान देणाऱ्या थोर क्रांतिकारकांच्या त्यागाचे आणि संघर्षाचे महत्त्व त्यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या शब्दांत पटवून दिले. विद्यार्थ्यांनी देशाचे सुजाण नागरिक बनून प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या दिमाखदार सोहळ्याप्रसंगी हर्षल गुल्हाने यांच्यासह शिल्पा गुल्हाने, अमोल गुर्जर, भूषण सावरकर, ब्राईट स्टार इंग्लिश कॉन्व्हेंट येथील प्रशांत गणोरकर, हेमलता गणोरकर, जयश्री नेरकर (बोके), पूजा खासबागे, प्रियंका देवघरे आणि शीतल काळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ब्राईट स्टार इंग्लिश कॉन्व्हेंटच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पावसाने दडी मारल्याने खरीप पिके संकटात
# मोर्शी तालुक्यातील शेतकरी हवालदिल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**हिवरखेड** – गेल्या काही दिवसांपासून पावसाने अचानक दडी मारल्याने मोर्शी तालुक्यातील हिवरखेड, बेलोना राजस्व मंडळासह परिसरातील शेतकऱ्यांची चिंता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. सुरुवातीला पावसाने हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरिपाची पेरणी केली खरी मात्र आता ऐन पिक वाढीच्या काळातच पावसाचा प्रदीर्घ खंड पडल्यामुळे शेतातील उभी पिके कोमेजु लागली आहेत.

### ५० ते ५५ टक्के पिके हातची जाण्याची भीती

पावसाच्या या खंडामुळे कपाशी, तुर, या प्रमुख नगदी व कडधान्य पिकांवर अत्यंत विपरीत परिणाम झाला आहे.तसेच या भागामध्ये संत्रा कलमांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली आहे.आणि मोठ्या झाडांवर मृग बहर तसेच आंबिया बहाराची संत्रा फळधारणा झाली होती मात्र पावसाच्या मोठ्या खंडामुळे संत्रा जमिनदोस्त होत असलेल्या मुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत असल्याने झाडांची वाढ खुंटली आहे. जर पावसाने अशीच दडी कायम ठेवली, तर संपूर्ण खरीप हंगाम तथा संत्रा वाया जाऊन शेती पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्याच्या परिस्थितीनुसार जवळपास ५० ते ५५ टक्के पिके हातची गेल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे.

### युवा शेतकऱ्यांची व्यथा

या बिकट परिस्थितीवर हिवरखेड येथील युवा शेतकरी देवेंद्र गोरडे व योगेश धोटे यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. 'आम्ही मोठ्या उत्साहाने आणि आशेने शेतीकडे वळलो परंतु निसर्ग मात्र साथ देत नाही. गेल्या २० दिवसांपासून पावसाचा पत्ता नसल्याने कपाशी, तुर कडधान्य पिके सुकू लागली आहेत. संत्रा उत्पादक शेतकरी अभिषेक धरमकर, रमेशचंद्र गांधी, राजेंद्र भेले, सुरेंद्र गणोरकर, विजय मेंढे, मंगेश पाटील, गोपाल जावरकर, गजानन मांडोकर, स्वप्नील अरुण अमृते यांनी सांगितले आहे की, उष्णता व पावसाने दडी मारल्यामुळे संत्रा मृग बहाराच्या तसेच आंबिया बहाराच्या फळांना जबर गळती लागली आहे. सोबतच खरीप पीकांवर मोहा चुडा या रोगाचा प्रादुर्भाव (अटॅक) झाला आहे. जर येत्या काही दिवसांत दमदार पाऊस झाला नाही, तर झालेला संपूर्ण खर्चही निघणे कठीण होईल, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

पावसाअभावी शेतकरी वर्ग आकाशाकडे डोळे लावुन बसला असून शासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन कोरडा दुष्काळसदृश परिस्थितीचे सर्वेक्षण करावे आणि नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. सोबतच येथील शेतकरी व गोपालक मोकलकर, शेळी पालक हेमराज वासनकर यांनी सांगितले की शेती सोबत दुध व्यवसाय म्हणून गोपालन केले तर दुधाळ जनावरांनी सुध्दा दुध उत्पादन कमी केले आहे. यामुळे गोपालक शेतकरी ही संकटात सापडला आहे तर या भागातील अनेक शेतकऱ्यांचे उभे पीक वन्यप्राणी फस्त करतात अशी माहिती शेतकरी संदिप काळे व गोपाल नेहारे यांनी दिली आहे तसेच श्याम कृषी विकास केंद्राचे संचालक श्याम ढोमणे, डवरे कृषी विकास केंद्राचे संचालक सागर डवरे, आपल ग्रोमरचे व्यवस्थापक निलेश गोबाडे यांनी पावसाचे खंड दिल्यामुळे याचा मोठा फटका दुकानदारांना सुद्धा बसला आहे.

# संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांसाठी हयात प्रमाणपत्र अनिवार्य; १८ ते ३१ ऑगस्ट दरम्यान विशेष शिबिर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेतील सर्व लाभार्थ्यांसाठी अर्थात हयात प्रमाणपत्र (डिएलसी) सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अमरावती तहसील कार्यालयाने १८ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत विशेष शिबिर आयोजित केले आहे. सर्व लाभार्थ्यांना विना विलंब हयात प्रमाणपत्र काढून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या निर्देशानुसार प्रत्येक लाभार्थ्याने बेनिफीशरी सत्यापन ॲपच्या माध्यमातून हयात डिजीटल लाईफ सर्टिफीकेट (डिएलसी) काढून आपण हयात असल्याचे प्रमाणित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र सादर केल्यास संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या सर्व लाभार्थ्यांचा शासकीय लाभ सुरु राहील. या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी अमरावती शहर संजय गांधी तहसील कार्यालयामार्फत विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सर्व लाभार्थ्यांनी विना विलंब हे प्रमाणपत्र काढावे असे तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. लाभार्थी मोबाईलवर संबंधित अॅप डाउनलोड करून स्वतः डिजिटल लाइफ सर्टिफिकेट तयार करू शकतात किंवा जवळच्या सेतू केंद्रात जाऊन डिजिटल लाइफ सर्टिफिकेट काढून घेऊ शकतात तसेच तहसील कार्यालयातूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६७८/२०२६ ने.ता.२३/०९/२०२६**

**अर्जदार** :- १) चंपत डोमाजी मोरे, वय अं.६९ वर्ष, धंदा- शेती, २) देविदास डोमाजी मोरे, वय अं.५५ वर्ष, धंदा- शेती, दोघेही रा.मलकापुर, ता.वरुड

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक ( कोणीही नाही )

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत डोमाजी दादुजी मोरे व बनाबाई डोमाजी मोरे, रा.मलकापुर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १८/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६८१/२०२६ ने.ता.२३/०९/२०२६**

**अर्जदार** :- १) सौ.कांचन संजय गोहत्रे, वय अं.४४ वर्ष, धंदा-गृहीणी, २) संजय संतोषराव गोहत्रे, वय अं.४७ वर्ष, धंदा- शेती, दोघेही रा.राजुरा बाजार, ता.वरुड

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक ( कोणीही नाही )

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत अथर्व संजय गोहत्रे, रा.राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२३/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १८/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.एम.डी.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६७३/२०२६ ने.ता.११/०९/२०२६**

**अर्जदार** :-१) श्रीमती लिला सहादेव कडु, वय अं.७५ वर्ष, धंदा-आराम, २) संजय सहादेव कडु, वय अं.५६ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ व २ रा.बहादा, ता.वरुड, ३) सौ.संगिता संजय घोरमाडे, वय अं.४९ वर्ष, धंदा- गृहीणी, रा.वार्ड क्र.२ ढगा, ता.वरुड

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक ( कोणीही नाही )

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सहादेव तुकाराम कडु, रा.बहादा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १८/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४१२/२०२६ ने.ता.३१/०८/२०२६**

**अर्जदार** :- १) दुर्गा बळीराम कुहिटे (कुयटे), वय अं.३६ वर्ष, धंदा-मजुरी २) बळीराम चिंध्या कुहिटे (कुयटे), वय अं.४४ वर्ष, धंदा- शेती,

दोन्ही रा.वार्ड क्र.१ पुसला, ता.वरुड

... विरुध्द ...

**गैरअर्जदार :-** निरंक ( कोणीही नाही )

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत समीर बळीराम कुहिटे ( कुयटे ), रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि. /०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख १८/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड




# डॉ.कृणाल बिजवे यांचे हस्ते आरती व पूजन करुन सुरुवात

## बंधुत्व दुर्गा माता देवस्थान ते कपिलेश्वर महादेव मंदिर गव्हाणकुंड पायदळ वारी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – शहरातील जागृत कॉलनी स्थित बंधुत्व दुर्गा माता देवस्थान व डॉ.भुषण खोले संचालित श्री यशवंत मल्टीस्पेशलीटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वरुड ते गव्हाणकुंड येथील कपिलेश्वर महादेव मंदिरपर्यंत १२ किलोमीटर पायदळ वारीचे आयोजन २३ ऑगस्ट रोज रविवारी संपन्न झाली.

जागृत कॉलनीमध्ये गेल्या ३० वर्षापासून स्थित बंधुत्व दुर्गा माता देवस्थानच्या वतीने नेहमी धार्मिक, सामाजिक, आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मागील वर्षीपासून ही वरुड ते गव्हाणकुंड पायदळ वारी सुरु करण्यात आली असुन याही वर्षी मोठ्या प्रमाणात महिलांचा विशेष समावेश होता. सकाळी १० वाजता स्थानिक मंदिरात पुजन करुन महादेव पालखीचे पुजन व आरती डॉ.कृणाल बिजवे यांच्या हस्ते पार पडले. त्यानंतर पोलीस स्टेशन मार्गे, पोस्ट ऑफिस, महात्मा फुले चौक, बसस्थानक, नवनाथ मंदिर, टेंभुरखेडा ते गव्हाणकुंड कपिलेश्वर महादेव मंदिरपर्यंत जवळपास १२ किलोमीटर पायी प्रवास असंख्य महिला, पुरुष यांनी मोठया भक्तीभावात पार केले. या वारीच्या मार्गात टेंभुरखेडा येथे गावकऱ्यांनी वारीतील सहभागी भक्तांकरिता बिस्कीट, चहा व पाण्याचे वितरण करुन आपली सामाजिक व धार्मिक सेवा अर्पण केली.



गव्हाणकुंड मंदिरात पोहचवुन आरती व पुजन करण्यात आले. त्यानंतर सहभागी वारकऱ्यांकरिता बंधुत्व दुर्गा माता देवस्थानच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था गव्हाणकुंड येथील मकसुद पठाण यांच्या शेतात करण्यात आली होती. श्रावण मास म्हणजे हिंदू धर्माच्या अनेक पवित्र सन उत्सव वं धार्मिक आयोजनाचा महिना असून याचं प्रमाणे दरवर्षी सुद्धा अशीच पायीवारी बंधुत्व दुर्गा माता देवस्थानच्या वतीने आयोजित केली जाईल, अशी माहिती बंधुत्व दुर्गा माता देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

## गोवंशाची कत्तल करुन मासाची विक्री करणारा ईसम अटकेत

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अंजनगांव सुर्जी** – एक इसम अवैध रित्या विनापरवाना गोवंष जातीचे जनावरांची कत्तल करून गोवंष मासाची विक्री करत आहे नमुद ठिकाणी जावुन पाहीले असता यातील नमुद आरोपी सदर जनावर चोरी करून आणून कत्तल केल्याचे संषय सदर ठिकानी पाहणी केली असता त्याचे दुकानावर मांस अंदाजे १२० किलो किंमत अंदाजे २४ हजार रुपये मास तूकडे कापण्याकरीता उपयोगात येणारा तराजूसह एकून २४ हजार ४५० रू चा गोवंष मास पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

## रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी सुषमा अंधारे, रुपाली ठोंबरे पाटीलसह १९ जणांविरुध्द गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची बदनामी केल्याप्रकरणी १९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रुपाली चाकणकर यांच्याकडून काही दिवसांपूर्वी पुण्यातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांकडून आज गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलिसांकडून गुन्हा दाखल** करण्यात आलेल्यांमधे रुपाली ठोंबरे, सुषमा अंधारे, दिपाली सय्यद, संगीता तिवारी, आशा मिरगे, हनुमंत गलगटे, वर्षा कांबळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सोशल मीडियाचे पदाधिकारी योगेश सावंत, मोहसीन शेख आणि महादेव बालगुडे यांचा समावेश आहे.

**काय आहे तक्रार?**

रुपाली चाकणकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, नाशिकच्या ईशान्येश्वर



महादेव मंदिराचे अध्यक्ष अशोक एकनाथ खरात यांच्याशी त्यांची ९ वर्षांपूर्वी एका सामाजिक कार्यक्रमात ओळख झाली होती. मंदिराच्या धार्मिक कार्यक्रमानिमित्त त्या तेथे जात होत्या. १८ मार्च २०२६ रोजी खरात यांना बलात्काराच्या गुन्ह्यात अटक झाल्याचे टीव्ही व प्रसार माध्यमांमधून समजल्यानंतर, त्यांच्यासोबतच्या सार्वजनिक कार्यक्रमातील फोटो-व्हिडिओ वापरून आपल्यावर असंबद्ध आरोप सुरू झाल्याचा दावा चाकणकर यांनी केला आहे.

२० मार्च २०२६ रोजी सोशल मीडिया तपासताना त्यांना सुमारे १९ फेसबुक / इंस्टा / युट्यूब अकाउंटवरून बदनामीकारक, अश्लील आणि धमकीवजा पोस्ट टाकल्याचे आढळले. या प्रकरणी त्यांनी – संगिता तिवारी, ॲड. अशोक बेदरे, अश्विनी खाडे, महादेव बालगुडे, हनुमंत गलगटे, वर्षा कांबळे, राजश्री समींदर, गणेश लोखंडे, हेमा पिंगळे, रंजना देशमुख, लॉजिकल सिधान्त, रुपाली पाटील ठोंबरे, सुषमा अंधारे, योगेश सावंत, दिपाली सय्यद, डॉ. आशा मिरगे आणि मोहसीन शेख यांची नावे तक्रारीत नमूद केली आहेत. त्यांनी केलेल्या पोस्टवर मिलिंद मारुती गोरे, सपना नंदकिशोर राऊत आणि इतर अनेकांनी लैंगिक, अश्लील आणि अपमानास्पद कमेंट करून विनयभंग व मानहानी केल्याचा आरोपही फिर्यादीत आहे. पुरावा म्हणून त्यांनी स्क्रीनशॉट आणि पोस्टचे पुरावे पोलिसांना सादर केले असून, मानसिक त्रास आणि सामाजिक मानहानी झाल्याचे म्हटले आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# विविध संघटनांच्या पुढाकाराने बुधवारी शहरात 'शिक्षक संवाद मेळावा'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, राज्य शिक्षक संघ, आय.टी.आय. निदेशक संघटना, वि.जे.एन.टी.आश्रम शाळा संघटना, एम.सी.व्ही.सी संघटना व कलाध्यापक महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २६ ऑगस्ट रोजी शहरातील अष्टविनायक सभागृह येथे 'शिक्षक संवाद मेळावा' आयोजित करण्यात आला आहे.

'शिक्षक हा समाजाच्या जडणघडणीचा शिल्पकार आहे' या संकल्पनेतुन आयोजित या मेळाव्यात शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शिक्षकांसमोरील आव्हाने, शैक्षणिक गुणवत्ता तसेच शिक्षकांच्या विविध समस्या व अपेक्षांवर सकारात्मक चर्चा व विचारमंथन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती संजय गणोरकर राहणार असुन माजी शिक्षक आमदार व्ही.यु.डायगव्हाणे यांच्या हस्ते मेळाव्याचे उदघाटन होणार आहे. शिक्षक आमदार आ.सुधाकर अडबाले विशेष अतिथी म्हणुन उपस्थित राहणार आहेत. मेळाव्याची भुमिका दिलीप कडू यांची असुन स्वागताध्यक्ष म्हणुन प्रसिध्द स्त्रि रोग व प्रसुती तज्ञ डॉ.मनोहर आंडे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे उपाध्यक्ष एस.जी.बरडे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या मेळाव्यास उत्क्रांती जरुडचे प्रशासन अधिकारी रामराव वानखडे, न्यू आँरेंज सिटी कॉन्व्हेंटचे सचिव अनिल गुल्हाने, नवयुवक शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, शेंदूरजनाघाटच्या जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, सचिव मोहन गणोरकर, विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दिलीप भोयर, जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे सचिव संतोष क्षीरसागर, न्यू आँरेंज सिटी कॉन्व्हेंटचे अध्यक्ष डॉ.राम गोधणे, ह्युंमन वेलफेअर अँड एज्युकेशन ट्रस्ट सचिव शाहिद रसीद, उर्दू एज्युकेशन सोसायटीचे सचिव सैय्यद मीर रुस्तम अली, बेनोडाच्या शहिद स्मृती शिक्षण समितीचे संचालक दीपक फरकाडे, न्यू इंग्लिश हायस्कुलच्या माजी मुख्याध्यापिका तारकेश्वरी सायर, स्व.शिवरामजी हिवसे शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.किशोर तडस आणि श्री.ल.दे.ब. शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा.अश्वापाल वानखडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांवर शिक्षकांना आपले विचार मांडण्यासाठी तसेच शिक्षकांच्या समस्या व अपेक्षांवर चर्चा करण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शिक्षकांच्या अनुभवातून आणि मार्गदर्शनातून शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळावी, हा या मेळाव्यामागील प्रमुख उद्देश आहे. मेळाव्यास वरुड व परिसरातील शिक्षक बांधव-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

